शनिवार, २३ मार्च २०१९

तरुण भारत

# ...तर समाधानातून यश निश्चित

## नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात यांचे प्रतिपादन : कमला कॉलेज पदवीदान समारंभ उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्वत:विरूध्द चाललेली लढाई त्यातून मिळणाऱ्या यशातून शाश्वत समाधान मिळते. कर्तृत्वाच्या पॅरामिटरमध्ये समाधान हे सर्वोच्च असते. यशातून समाधान मिळत नाही तर समाधनातून यश मिळते. ही गोष्ट लक्षात घेऊन आयुष्यात यशस्वी होण्यासाठी ध्येय निश्चित करा. हे ध्येय तुमच्या दृष्टीने सर्वोच्च असले पाहिजे त्यापर्वंत पोहचण्यासाठी सर्वार्थाने प्रयत्न करा, असे प्रतिपादन नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात यांनी केले.



कोल्हापूर : यशवंतराव थोरात यांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र स्वीकारताना भाग्यश्री घराळ. सोबत डावीकडून डॉ नीता धुमाळ, प्राचार्य डॉ एस. एस. गवळी,डॉ एन. एस. पवार, डॉ. क्रांतिकुमार पाटील, डॉ प्राजक्त पाटील, प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर.

कमला कॉलेजमधील पदवीदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. थोरात बोलत होते. व्ही.टी. पाटील सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील होते. बी.ए, बी.कॉम, बी.सी.ए, बी. व्होक या अभ्यासक्रमाच्या २९ विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तर एकूण २१३ विद्यार्थिनींना पदवी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

डॉ. थोरात म्हणाले, ग्रामीण भागातून शिक्षण घेत असताना अनेक अडचणींवर मात करून तुम्ही यशस्वी झालात. समाजाच्या मुख्य प्रवाहात येताना अनेक चढ उतारांचा सामना करावा लागतो. पण यश, पैसा आणि प्रसिद्धी हे सर्वस्व नाही. तर तुमचे प्रयत्न आणि त्यातून यशाचा गाठलेला टप्पा हेच खरं यश असते. आवडीनुसार अभ्यासाची शाखा निवडून, करिअरही आवडीनुसार निवडाल तर यश निश्चित मिळते. स्वत:चा निर्णय हा कधीही हिताचा असतो. त्यामुळे स्वतः निर्णय घेऊन अभूतपूर्व कामगिरी करा. कष्ट आणि मिळणाऱ्या संधी याही तितक्याच महत्त्वाच्या असतात. अपयशाने खचून न जाता पुन्हा प्रयत्न करा, असा सल्लाही नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ यशवंत थोरात यांनी दिला.

अध्यक्षस्थानावरून डॉ. क्रांतिकुमार पाटील म्हणाले, मिळवलेल्या ज्ञानाचा समाजाला उपयोग करून देणे म्हणजेच शहाणपणाचे लक्षण आहे. पेशवाईच्या काळात महात्मा फुले यांनी वर्णव्यवस्थेच्या विरोधात जाऊन सामाजिक व शैक्षणिक क्रांती करून, १८४८ साली मुलींसाठी पाहिली शाळा काढली. राजर्षी शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. वसतिगृहाची संकल्पना मांडली, त्यानंतर सर्वत्र ही संकल्पना राबवण्यात आली. महाराष्ट्रात अशी माणसे घडली नसती तर आज शैक्षणिक प्रगती झाली नसती. बडोदा संस्थानचे सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या संस्थानात सक्तीचे शिक्षण कायदा केला. म्हणूनच देशात शिक्षण क्रांती झाली. कौशल्य व व्यावसायिक शिक्षणाकडे विद्यार्थ्यांनी वळायला पाहिजे, असेही ते म्हणाले.

प्राचार्या डॉ तेजस्विनी मुडेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुजय पाटील यांनी सूत्रसंचालन व पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. रेखा पंडीत यांनी आभार मानले. यावेळी ताराराणी विद्यापीठाचे उपाध्यक्ष डॉ एन. एस. पवार, डॉ प्राजक्त पाटील, प्राचार्य डॉ एस. एस. गवळी, परीक्षा विभाग प्रमुख डॉ नीता धुमाळ यांच्यासह विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.